अग्रलेखांचा बादशहा नवा काळ

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा बादशहा नवा काळ

# पांडुरंगा! रंगभूमीला जीवदान दे

महाराष्ट्राला असलेला संपन्न रंगभूमीचा वसा आता संपुष्टात आला आहे. अनुभवसमृध्द आणि कसदार लेखणीतून आकाराला येणारी नाटके इतिहासजमा झाली आहेत. कारण तसे लेखक उरलेले नाहीत. सध्याची नाटके म्हणजे फाटके तुटके गोळा करून वेगळं दाखवण्याचा प्रयत्न असतो. महाराष्ट्राचे अध्यात्मपीठ असलेल्या पंढरपुरामध्ये नाट्यसंमेलनाला सुरुवात होत आहे. निदान या तीर्थक्षेत्री तरी पांडुरंगाने तमाम नाट्यकर्मींना सद्बुध्दी द्यावी, अशी अपेक्षा व्यक्त केली तर ती अनाठायी ठरणार नाही. एकूणच नाट्य व्यवसायाविषयी बरेच काही सांगता येईल. अभिनयाच्या बाबतीत तर बोलायला जागाच उरलेली नाही. ज्याला कुठेही काही थारा नाही त्याने थिएटरच्या दारात जावे आणि अभिनेता म्हणून मिरवावे अशी आज अवस्था आहे. बोटावर मोजण्याइतकी चार दोन मंडळी सोडली तर फारशी समाधानकारक परिस्थिती नाही. मराठीमध्ये एखाद्याला थोडेसे टोचून बोलायचे असेल तर काय नाटके करता राव असे आपण सहजपणे म्हणतो. हीच आज नाटकवाल्यांची परिस्थिती आहे. ती काय नाटकं करतात हे त्यांचे त्यांना माहीत नसते. या सगळ्यांचे प्रतिनिधीत्व करणारा अखिल भारतीय नाट्य निर्माता संघ किंवा अखिल भारतीय नाट्य परिषद यांच्यातले मतभेद हे तर त्यांच्यातल्या नाटकीपणाचा विक्रम करणारे असतात. या संस्थांवर वर्णी लावून घेणे फारसे कठीण उरलेले नाही. परंतु, आपल्याच कोषामध्ये वावरणारी ही सगळी मंडळी महाराष्ट्राच्या एका संपन्न सांस्कृतिक वारशाचा दर्जा टिकवण्यात पूर्णपणे अपयशी ठरलेली आहेत यातही काही शंका उरत नाही. ज्या रंगभूमीची एकेकाळी जागतिक पातळीवर दखल घेतली जात होती तो वारसा टिकवण्याची इच्छाही दिसत नाही. मुळातच या सगळ्या सांस्कृतिक वैभवाचे गांभीर्य उरलेले नाही. नाटक हा व्यवसाय असला तरी त्यात मूल्यांची कोणतीच भूमिका न उरल्यामुळे अभिनयालासुध्दा बाजारात किंमत राहिलेली नाही. पैसा आणि प्रसिध्दी अशा काहीशा संकुचित आणि मर्यादित हेतूने सध्या नाटक व्यवसाय चालवला जातो. लोकांनी उत्स्फूर्तपणे प्रतिसाद द्यावा, समाजामध्ये त्याची चर्चा व्हावी, असे एकही नाटक गेल्या दहा वर्षांत रंगभूमीवर आले नाही आणि येण्याची शक्यता नाही. यावरूनच नाट्यव्यवसाय काय आणि त्यानिमित्ताने होणारी नाट्यसंमेलने काय, हा सगळाच प्रकार एखाद्या इव्हेंटसारखा ठरू लागला आहे. रसिकांना गुंतवून ठेवणारी, समाजमन हलवून सोडणारी किंवा नाटक पाहताना रसिकांच्या हृदयाचा ठोका चुकवणारी प्रभावी नाटके आता उरलेली नाहीत. याचा विचार या नाट्यसंमेलनांच्या निमित्ताने होणार आहे का?

## सिध्दांताचेच विस्मरण

मनोरंजन ही समाजमनाची गरज असते. ती भागवताना कलापूर्ण पध्दतीने तिचा विचार झाला पाहिजे, असा सिध्दांत अगदी या रंगभूमीच्या प्राणप्रतिष्ठेपासून मांडला गेला. असे म्हटले जाते की, सतराव्या शतकामध्ये तंजावरच्या राजपुरुषाने हा काहीसा नृत्यप्रधान आणि वाङ्मयीन मूल्य असलेला नाटक प्रकार सुरू केला. परंतु प्रत्यक्षात हा नाट्यप्रकार महाराष्ट्रात यायला १८४३ साल उजाडावे लागले. मराठीत येणारे नाटक हे अधिक कलापूर्ण आणि परिणामकारक असावे असा पहिला प्रयत्न त्यावेळेला सांगलीचे अधिपती म्हणून असलेल्या चिंतामणराव अप्पासाहेब पटवर्धन यांनी केलेला दिसून येतो. कर्नाटकी भाषेत असलेल्या 'यक्षगान' नाटकाचे नाट्यदर्शन त्यांनी पाहिले. आणि त्यावरून अधिक सकस असे नाटक मराठीत तयार करण्याची इच्छा आपल्या दरबारात असलेल्या विष्णू अमृत भावे यांना सांगितली. त्यांच्या या प्रयत्नातून 'सीता स्वयंवर' नावाचे मराठी नाटक सिध्द झाले. सांगलीला झालेला हा पहिला प्रयोग मराठी रंगभूमीचा प्रतिष्ठापना दिन ठरला. कर्नाटकाची अशी ही छोटीशी परंपरा मराठी रंगभूमीला आहे आणि आज पंढरपुरामध्येच आलेल्या विठोबालाही कर्नाटकाचीच परंपरा असल्याने या स्थानऔचित्याचा योग्य मेळ घातला तर भविष्यात मराठी रंगभूमीला पुन्हा एकदा नव्या दमाने समृध्द करण्याची गरज आहे. कृष्णाजी प्रभाकर खाडीलकरांनी भाषेचा वापर योग्य पध्दतीने कसा करता येतो याबाबत नागपूरच्या साहित्य संमेलनात असे मत मांडले होते की, भाषेला वेदांमध्ये 'धेनू' म्हटले जाते. ही 'धेनू' रोजच्या व्यवहारात लागणारे दूध तर देतेच. पण, तसेच भक्त मिळाल्यास कामधेनूही होते. मराठी रंगभूमी 'कामधेनू' व्हायची असेल तर पंढरपुरात या कलावंतांच्या मांदियाळीमध्ये तसे भाषासंपन्न आणि कलासक्त भक्तांनी तेवढेच सशक्त प्रयोग करण्याचे व्रत स्वीकारले पाहिजे. गेल्या दीडशे वर्षांच्या कालावधीत मराठी रंगभूमीला अनेक वेळेला उर्जितावस्था प्राप्त करावी लागली. विष्णूदास भावेंनी केलेल्या नवीन उपक्रमांमुळे रंगभूमीच्या योगक्षेमाचे नवे आश्वासन अनेकांना प्राप्त झाले. १८८० साली झालेल्या 'शाकुंतला'च्या चार अंकांच्या प्रयत्नांनी मराठी रंगभूमीवर एका नव्या युगाचा प्रारंभ झाला होता, हे नाकारता येत नाही. किर्लोस्कर, देवल यासारख्या दिग्गजांनी किंवा भाऊराव कोल्हटकरांच्या नाट्यगुणांमुळे वेगळ्या थाटाची आणि गुणात्मक नाटके रंगभूमीवर आली.

## कर्तृत्वसंपन्न नेतृत्व हवे

खाडीलकरांच्या गद्य नाटकांनी तर भारतीय संस्कृतीच्या आदर्श मूल्यांचा पुरस्कार केला. अजूनही कीचकवध, भाऊबंदकी या नाटकांची स्मृती कायम आहे. एकूणच नाटक आणि तत्कालिन नाट्यसंगीत यामध्ये एक प्रौढ आणि भारदस्तपणा होता. या मराठी रंगभूमीच्या श्रेष्ठत्वासाठी ज्यांनी आपली आयुष्ये खर्ची घातली, अशा कितीतरी दिग्गजांची नावे सांगता येतील. तोच समृध्द वारसा आहे. त्याच्याकडे अक्षम्य दुर्लक्ष होत आहे ही खंत मनाला टोचल्याशिवाय राहात नाही. नाट्य व्यवसायाची परंपरा निष्ठायुक्त अभिनय आणि उच्च कलागुणांच्या नेपथ्यावरच टिकून राहू शकते. दुर्दैवाने आज या दोन्ही गोष्टी आढळत नाहीत. या क्षेत्रामध्ये शिरलेला विलासीपणा आणि अल्पकाळाच्या प्रसिध्दीतून मिळणारा हौशीपणा रंगभूमीला विकसित होऊ देत नाही याचे थोडेतरी भान नाट्यसंमेलनांच्या निमित्ताने बाळगले गेले पाहिजे. इतिहासाची ही पूर्वपुण्याई अजूनही उपयोगाला येऊ शकते. मात्र त्यासाठी रंगभूमीच्या उज्ज्वल भवितव्याची स्वप्ने पाहणाऱ्या आणि नव्या क्षितीजांवर नवे अक्षर कोरणाऱ्या निष्ठावंत कलाकारांच्या परिपक्व नेतृत्वाची आणि कर्तृत्वाची गरज आहे. नाट्यप्रयोगांप्रमाणे संमेलनेही होतात आणि जातात. उखाळ्या-पाखाळ्या यालाही ऊत येतो. पण रंगभूमीचे नुकसान होत राहते.